# राशिभविष्य - जून, २०२२.

दादा दामले(dadadamle@gmail.com)

==========================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या-त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला होते. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणासही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत मंगळ , गुरु, नेपच्यून असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह या राशीच्या मंडळींना प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. मंगळामुळे आर्थिक चिंता, वाद, भांडणे मानहानी होणे संभवते. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. हा मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहे. त्या काळात स्वभाव हट्टी होईल व अहंकार प्रबळ होईल, अकारण श्रम, दगदग, शरीरपीडा होईल व अनारोग्याचा त्रास होणेही संभवते. व्ययस्थानी असलेला गुरु समाजसेवेची मनापासून ओढ असणारांना अनुकुल होईल व गुरु-नेपच्यून हे दोन्ही ग्रह अध्यात्माची आवड असणारांना मन:शांतीसाठी आध्यात्मिक उपासनेस अनुकुल होतील. शिवाय येथील नेपच्यून गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांनाही अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत प्रथमपासून शुक्र, हर्षल, राहू असे तीन ग्रह आहेतच. येथील राहूमुळे अपमान होतील, व काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा होईल व कोणाचाही धाक, दडपण सहन होणार नाही. केवळ शुक्रामुळेच सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात येथील शुक्र या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत जात आहे.त्या काळातही तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे धनलाभ होणे संभवते. तसेच त्याच्यामुळे कौटुंबिक व वैवाहिक सुख समाधान लाभेल. पण या धनस्थानी असलेले रवि -बुध हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व रविमुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील, भांडणे होतील व काही मंडळींना डोळ्याच्या अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. बुधामुळे दु:ख, मनस्ताप सहन करावा लागेलच; पण त्याच्यामुळे अर्थलाभ होणेही संभवते. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत जात आहे. त्या काळात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, धनलाभ होणेही संभवते. शासकीय नोकरीत असणारांना विविध प्रकारे लाभ होतील, काही

मंडळींचा सन्मान होणे तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर राहील व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत शनि असून तो सर्वसाधारणपणे अनुकुल होईल; पण त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने 'श्रीगणपति अथर्वशीर्ष" स्तोत्राचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनीकुमाराभ्याम नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, मन उदार होईल व मानसिक आरोग्य उत्तम राहील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत शनि असून महिन्याच्या पूर्वार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही मंडळींच्या जीवनात अविस्मरणीय घटना घडण्याची शक्यता दिसते. त्याच्यामुळे महिन्याचा उत्तरार्ध सर्वसाधारण ठीक जाईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत मंगळ -गुरु-नेपच्यून असे तीन ग्रह असून मंगळामुळे सहजपणे अर्थलाभ होणार नाही. झगडावे लागेल. तसेच त्याच्यामुळे मित्रांशी वितुष्ट येण्याची शक्यता दिसते. पण त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. गुरु- मुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, धनलाभ होणेही संभवते, काही मंडळींना वाहनसुख मिळेल. विवाहेच्छूना विवाहयोग येईल, आणि या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करता येईल. काही मंडळींना नवे मित्र मिळतील.पण नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे, अर्थप्राप्तीत अडथळे येणे संभवते. तसेच कुमार्गी मित्रांपासून मनस्ताप सहन करावा लागेल व नैराश्य येईल. जपा. येथील मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत जात आहे. त्या काळात तो पूर्णपणे अशुभ होईल. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू-हर्षल-शुक्र असे तीन ग्रह आहेतच. येथील राहूमुळे हितशत्रूंपासून रक्षण होईल. पण त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. काही मंडळींकडून ढोंगी आचरण होणेही संभवते. येथील हर्षल प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना नको त्या प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. काही मंडळींवर बेअब्रू ची आपत्ती येईल. शत्रुत्व निर्माण होणे संभवते. तसेच अपघात भयही आहे. जपा. पण येथील शुक्रामळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा

मिळेल. हा शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत  जात आहे. त्यावेळीसुद्धा तो सुखकारकच होईल. या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत प्रथमपासून रवि व बुध असे दोन ग्रह आहेतच. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे
अनारोग्य, थकवा, कसली तरी चिंता मनस्ताप देईल. त्याशिवाय आर्थिक समस्या त्रस्त करतील. भांडणे होणेही संभवते. येथील बुध प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे मनस्थिती चंचल, अस्थिर होईल, आर्थिक नुकसान, मित्रद्रोह होणे संभवते. काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणेही शक्य दिसते. श्रद्धा असेल तर शिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने " शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी " ओम ब्रह्माय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होणे संभवते. तसेच काही मंडळींना पोटाच्या अनारोग्याचची समस्या त्रस्त करील. पण गूढ संशोधन, अध्यात्म यांची आवड असणारांना तो अनुकुल होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत शनि असून तो कायदा, तत्त्वज्ञान, चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत मंगळ , गुरु व नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील मंगळामुळे नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागण्याची शक्यता आहे. शिवाय वरिष्ठांचा कोप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. काही मंडळींना हाती असलेली नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि त्रस्त करील. पण त्यांनी तो मोह टाळावाच. येथील गुरु बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल होईल व त्यांच्या कर्तृत्वावर वरिष्ठ प्रसन्न होतील. त्यामुळे काही भाग्यवंतांचा मानसन्मान होणेही शक्य दिसते. येथील नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. येथील मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत जात आहे. त्या काळात त्याच्यामुळे मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. या लाभस्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू-हर्षल-शुक्र असे तीन ग्रह आहेतच. पैकी येथील राहूमुळे

संततिविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय ज्यांना नोकरीत अधिकार पद आहे अशापैकी काहींना वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा अस्वस्थ करील. पण त्यांनी व जुगाराची ओढ असणारांनी तो मोह टाळावाच. येथील हर्षलमुळे काय घडेल ते सांगणे कठीण आहे. पण त्याच्यामुळे मित्रांशी भांडणे होणे व शत्रुत्व निर्माण होणे संभवते. जपा. पण येथील शुक्र अनुकुल होईल व सतत मंनोनुकुल घटना घडतील. त्यामुळे दिलासा मिळेल. हा शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यावेळीही तो अनुकुलच होईल व सर्व काही सुखाचेच घडेल. या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत रवि व बुध असे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच हा राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो आणि बुध हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे शरीरपीडा, मानभंग होणे संभवते त्याशिवाय नियोजित कार्यात अपयश येणे संभवते. त्याशिवाय अनारोग्य, थकावट, मनस्ताप, चिंता,कसली तरी भीती अस्वस्थ करीतसे दिसते. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीजगदंबा दुर्गादेवी स्तोत्रा "चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी " ओम सोमसोमाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी "ओम नमः: शंकराय" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी " ओम अदितिये नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत केतू असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे घरीदारी कोणाशी पटणार नाही, कसली तरी चिंता अस्वस्थ करील. शिवाय तो विषभयकारक असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ या स्वतः:च्या राशीत शनि असून तो अति प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अपघात भय असून त्याच्यामुळे एखादा विचित्र आजार होणे संभवते.जपा. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत मंगळ -गुरु-नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील मंगळामुळे प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. म्हणून शक्यतो प्रवास करू नका. महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत जात आहे. त्या काळात या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा असह्य ताण सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. वरिष्ठांशी वाद, भांडण होणे संभवते. तसेच स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मी येईल. येथील राहू बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल व त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना नोकरीत एखादे अधिकार पद मिळणेही संभवते. क्वचित कोणाचा सन्मान केला जाणेही शक्य दिसते. येथील हर्षल

उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल या दशम स्थानी असलेला शुक्र महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर अनुकुल होईल व त्याच्यामुळे अपेक्षित सुखशांती मिळू शकेल. या राशीच्या लाभस्थानी प्रथमपासून रवि -बुध हे दोन ग्रह आहेतच. पण येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे नोकरीत बढती, पगारवाढ, क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. आरोग्य उत्तम राहील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे शरीरपीडा व मानभंग होणे संभवते. जपा. या राशीच्या लाभस्थानी असलेला बुध संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल होईल व त्याच्यामुळे अर्थलाभ, मित्रलाभ होणे संभवते. शिवाय अपेक्षित सुखसमाधानही लाभेल. श्रद्धा असेल तर शिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम बृहस्पतये नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम सर्पाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे मानसिक दु:ख सहन करावे लागेल. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे विवाहेच्छू वधूवरांना विवाहयोग येणे संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत मंगळ -गुरु-नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे उष्णताविकाराचे आजार बळावण्याची शक्यता आहे. तसेच महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात प्रवास करू नका. कारण प्रवासात मनस्ताप व मानहानी होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचा योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होऊ शकेल. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला नेपच्यून जलभय-विषभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका, जलप्रवास करू नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत राहू-हर्षल-शुक्र असे तीन ग्रह असून येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात

या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व सर्व प्रकारे सुखकारकच होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने तो प्रतिकुल होईल व कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांच्या नोकरीव्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होतील. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला राहू सभाधीटपणा व भाषणबाजीची कला अवगत असणारांना अनुकुल होईल. व त्यामुळे अशा काही व्यक्तींचा सत्कार होणेही संभवते. येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. तसेच काही मंडळींना दूरच्या प्रवासाची तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. येथील बुधही अनुकुल होईल व त्याच्यामुळे मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनवृद्धी होणेही संभवते. श्रद्धा असेल तर भगवान श्रीविष्णूची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णुसहस्रनाम स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.
"

**(६) कन्या -** या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. त्याशिवाय तो अनारोग्यकारक होणेही संभवते. त्याच्यामुळे या राशीच्या विवाहेच्छू वधूवरांना विवाहयोग येण्याची शक्यता दिसत नाही. पण हा शनी दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत मंगळ -गुरु-नेपच्यून असे तीन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे उष्णताविकारांचे अनारोग्य होणे संभवते. हाडमोड होण्याची शक्यताही दिसते. जपा. त्याशिवाय पतिपत्नीमधील वाद, गैरसमज, दोघापैकी कोणाचे अनारोग्य अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखास तो प्रतिकुल होईल. तसेच तो जल व वीजभयकारक असल्याने खोल पाण्यात पोहू नका. विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरुमुळे ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील. काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल. नवे स्नेहसंबंध जुळून येतील. प्रवासयोगही संभवतात. अर्थलाभ होणेही संभवते. येथील नेपच्यून वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत राहू-हर्षल-शुक्र असे तीन ग्रह असून येथील राहू वाममार्ग धन प्राप्तीचा

मोह निर्माण करील. जपा. येथील हर्षल धोकादायक व अपघातभयकारकच होईल. जपा. येथील शुक्र मात्र अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थप्राप्ती होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. पण हा शुक्र या राशीच्या वृद्ध मंडळींना प्रतिकुलच होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा शुक्र या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत जात आहे. त्या काळातही तो अनुकुल व लाभदायकच होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला बुधही प्रतिकुलच होईल. व त्याच्यामुळे वाद, भांडणे, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. श्रद्धा असेल तर श्रीदुर्गादेवीची उपासना व श्रीशिवशंकराची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “दुर्गादेवी स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “शिवलीलामृत स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापसून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ ओम सूर्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत केतू असून तो सुखकारक होईल; पण त्याच्यामुळे वाहनधोका असल्यामुळे रस्त्याने चालत जाताना किंवा वाहन चालवत असताना सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे चिकाटीचा गुण प्राप्त होईल व चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल होईल. पण त्याच्यामुळे स्वभाव संशयी, स्वार्थी होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत मंगळ -गुरु-नेपच्यून असे तीन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात हा मंगळ अनारोग्यकारक होईल, इजा होणेही संभवते, तसेच चोरी होणे,अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागणे, आर्थिक नुकसान होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात पतिपत्नीपैकी कोणाचे तरी अनारोग्य, दोघांतही वाद, मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक सुखात बाधा येणे संभवते. स्वभाव संशयी होईल. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू-हर्षल-शुक्र असे तीन ग्रह आहेतच. पैकी हर्षलमुळे सुद्धा वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. पण शुक्रामुळे

परिस्थिती आटोक्यात राहील व वैवाहिक जीवनातील सुखात फारशी बाधा येणार नाही. हा शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्या काळात तो या राशीच्या वृद्धांना प्रतिकुल होईल. पण या राशीच्या काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. ज्याच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत प्रथमपासून रवि -बुध हे दोन ग्रह आहेतच. पैकी रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुल होण्याचीच शक्यता आहे. त्याच्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, दु:ख, अपयश, संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला बुध मात्र अनुकुल होईल व मनोनुकूल घटना घडतील. श्रद्धा असेल तर “शिवशंकराची उपासना” व “श्रीहनुमान उपासना”अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ओम वायवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव चंचल, लहरी असा होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे काही मंडळींना अपेक्षित अशी सुंदर नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत मंगळ -गुरु-नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील मंगळामुळे काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. काही मंडळींना मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची किंवा कोणाची आचरणविषयक समस्या मनस्ताप देतील. हा मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत जात आहे. त्या काळात काही मंडळींना अनारोग्याचा तर काही मंडळींना अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय आर्थिक नुकसान होणे, चोरी होणेही संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेला गुरु सर्व प्रकारे सुखकारक होईल व त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शेक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील. त्याशिवाय अर्थलाभ होणेही संभवते. येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अति भावनाशील होईल व तो अध्यात्म, गूढ संशोधन यांत रस असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत

राहू-हर्षल-शुक्र असे तीन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील राहू अनारोग्यकारकच होईल;पण ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे तो लाभदायक होईल. येथील हर्षलमुळे मनस्थिती अस्थिर, चंचल अशी होईल. अति खोल विचार करत असणारांनी डोके शांत ठेवावे. नपेक्षा डोकेदुखी किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. येथील शुक्रामुळे उच्च कलागुण असूनही ते व्यक्त करण्यासाठी संधीच मिळणार नाही. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा शुक्र या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत गेल्यावर अनुकुल होईल व विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल, प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत प्रथमपासून रवि -बुध हे दोन ग्रह आहेतच. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो अनारोग्यकारकच होईल; पण तो केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व सर्व काही प्रतिकुल तेच घडेल. येथील बुधामुळे भांडणे होतील व दु:ख सहन करावे लागेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे सतत मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना मनपसंत अशी उत्तम नोकरी मिळेल. तर काही मंडळींना मनपसंत असे आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण या राशीच्या मंडळींना भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत मंगळ -शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत जात आहे. त्यामुळे हा मंगळ संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे मनस्ताप, कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे होण्याची शक्यता दिसते त्याशिवाय असमाधानकारक घटना घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे अनारोग्य, अपघात भय असून संततीकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. पण गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार

पडतील;  पण नातेसंबंधातील कोणाकडून  तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. येथील नेपच्यूनसुद्‌धा गृहसौख्याचे दृष्टीने प्रतिकुलच होईल. या राशीच्या पंचम स्थानी प्रथमपासून शुक्र-राहू-हर्षल असे तीन ग्रह आहेतच. येथील शुक्रामुळे सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत प्रगती करणे शक्य होईल व मन प्रसन्न राहील. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व कलाकारांना आपले कलेतील कर्तृत्व प्रकट करण्यास संधीच मिळणार नाही. येथील राहू प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वैवाहिक व संततिसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. येथील हर्षल कलापोषक असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना अंतर्ज्ञान शक्ती प्राप्त होण्याची शक्यता दिसते. तसेच तो उच्च बौद्‌धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो दशम या नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक होईल, हितशत्रू पराभूत होतील, पण महिन्याच्या उत्तरार्धात तो केंद्रस्थानी जात असल्याने भाग्योदयकारक होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला बुधही अनुकुलच होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्‌धी होईल, धनलाभ होणेही संभवते. शिवाय या राशीच्या काही मंडळींना कीर्ती -प्रसिद्‌धी मिळण्याची शक्यताही आहे. श्रद्‌धा असेल तर "श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना" अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्‌धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्‌धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निॠतये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मी येईल. पण त्यांनी तो मोह टाळावाच. आहे ती नोकरीच मनापासून करावी. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात काही अनिष्ट घडण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत मंगळ -गुरु-नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत जात आहे. तृतीय स्थानी असताना हा मंगळ अनुकुल होईल, त्याच्यामुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल, आणि हातून काही कर्तबगारीची घटना घडणे संभवते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहापासून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात व

गृहसौख्यात बाधा येणे संभवते. तृतीय स्थानी असलेला गुरु या राशीच्या लेखक मंडळींना अनुकुल होईल व त्याच्यामुळे प्रवासाचे योग येतील. पण एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनात्मक होईल व अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. त्याशिवाय तो गूढ संशोधनात रस असणारांनाही अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. त्याशिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाची तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी प्रथमपासून शुक्र-राहू-हर्षल असे तीन ग्रह आहेतच. येथील शुक्रामुळे सुखसमाधान लाभेल; पण या राशीच्या ज्यांच्याकडे शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून अधिक लाभ होणे संभवते. हा शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्या काळातही तो सर्व प्रकारच्या कलाक्षेत्रातील मंडळींना प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेले राहू व हर्षल हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे कशातही सुखसमाधान लाभणार नाही, कोणाशी पटणार नाही, सतत तक्रारी करत राहाल व त्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे शक्य दिसते. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत प्रथमपासून रवि -बुध असे दोन ग्रह आहेतच. येथील रविमुळे नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय तो अनारोग्यकारक व अपघातकारक होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत गेल्यावर हितशत्रू पराभूत होतील व तो दशम या नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेला बुधही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे संतती व स्त्रीपासून मनस्ताप होणे संभवते. श्रद्धा असेल तर शिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “ हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत शनि असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होणे संभवते. कौटुंबिक जीवनात प्रिय जनांपैकी कोणाचे स्थलांतर झाल्यास मन अस्वस्थ होईल व नैराश्य वाढेल. पण काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत मंगळ -गुरु-नेपच्यून असे तीन ग्रह

असून येथील मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्तांहात या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत जात आहे. त्यामुळे जवळ जवळ महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे उष्णताविकाराचे अनारोग्य होणे संभवते. त्याशिवाय त्याच्यामुळे आर्थिक समस्या निर्माण होतील व चिंता अस्वस्थ करील. पण तो या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व धैर्य, हिंमत वाढेल. पण एखादी दुखापत होणे संभवते. जपा. या राशीच्या धनस्थानी असलेला नेपच्यूनही प्रतिकुलच होईल व आर्थिक समस्या व चिंता यांत भरच पडेल. पण येथील गुरुमुळे अपेक्षित अर्थलाभ झाल्यास चिंतेचे ओझे गळून पडेल. शिवाय कुटुंबात शुभ घटना घडल्यास कौटुंबिक सुखातही फारशी बाधा येणार नाही. या राशीच्या तृतीय स्थान मेष राशीत हर्षल-राहू-शुक्र असे तीन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. येथील राहूही अनुकुल होईल; पण त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. मात्र शुक्र अनुकुल होईल व त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळीना धनलाभ, काहींना भूमिलाभ तर क्वचित कोणास मान, प्रतिष्ठा प्राप्त होणेही संभवते. हा शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्या काळात तो सुखकारकच होईल व त्याच्यामुळे शेतीवाडी असणारांना तो लाभदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी प्रथमपासून रवि - बुध हे दोन ग्रह आहेतच. पैकी रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात हा रवि प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दुःख, आर्थिक चिंता, कौटुंबिक त्रास, नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. त्याशिवाय संततिसमस्याही मनस्ताप देण्याची शक्यता दिसते. येथील बुधामुळे गृहसौख्य, मित्रसुख लाभेल. पण त्याच्यामुळे धननाश होणेही संभवते. श्रद्धा असेल तर शिवशंकराची व हनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. ,म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन** - या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत शनि असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना आर्थिक लचांडाला तोंड देण्याची पाळी येईल. त्यातून मानहानी होण्याची शक्यता दिसते. जपा. सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करा. इतर सर्व मंडळींना कसल्या तरी संकटाला

तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते. काळजी घ्या. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत मंगळ -गुरु-नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मेष राशीत जात आहे. त्यामुळे या संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुलच होईल; व त्याच्यामुळे स्वभाव हट्टी, अहंकारी होईल, अकारण श्रम, दगदग कराल व त्यामुळे थकवा येईल. काही मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक चिंता त्रस्त करतील. पण गुरु ग्रहामुळे दिलासा मिळेल व हा गुरु बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. नेपच्यूनमुळे मनस्थिती अतिशय कोमल होईल व मानसिक संवेदना तीव्र होतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहिरे नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू-हर्षल-शुक्र असे तीन ग्रह असून येथील राहूमुळे कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे होण्याची शक्यता दिसते. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना आर्थिक चिंताही अस्वस्थ करील. हर्षलमुळे विचारशक्ती अति अस्थिर होईल व त्यामुळे हातून विचित्र आचरण घडणे संभवते. शिवाय आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे याचे भानही राहणार नाही. पण येथील शुक्र मात्र अनुकुल होईल व त्याच्यामुळे अर्थलाभ होईल, कौटुंबिक जीवनात मनोनुकुल घटना घडतील. हा शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्या काळातही तो अनुकुल होईल व काही मंडळींना भूमिलाभ तर क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत प्रथमपासून रवि -बुध हे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, धनलाभ होणेही संभवते. नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर खूष होतील, क्वचित कोणाचा सन्मान होणेही शक्य दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक त्रास, दु:ख, कार्यदिरंगाई, आर्थिक चिंता त्रस्त करतील. या तृतीय स्थानी असलेला बुधही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे हितशत्रूपासून त्रास होणे संभवते. तसेच अकारण शत्रुत्व होणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळेही काही मंडळींना अनारोग्याचा तर काहींना कौटुंबिक वाद, भांडणाचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते, श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====